CMYK

अती दुर्गम मेळ जानुरी गाव आमदार सिद्धार्थ खरात यांनी घेतले दत्तक >> पान 2

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर पडणार- आनंदराज आंबेडकर >> पान 3

रस्ता सुरक्षा जनजागृती अभियान पोस्टरचे जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांच्या हस्ते विमोचन >> पान 4

**सुविचार**

शहाणपण हे फक्त परिस्थिती हाताळण्यात नाही, तर विचार करण्याच्या दृष्टिकोनात आहे.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



ज्या बिकिनी सीनमुळे फेमस झाली सई ताम्हणकर, त्या सिनेमाचा येतोय सिक्वेल, फर्स्ट लुक आऊट

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 171 ■ शनिवार, दि. 01 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## आठवड्यातले ५ दिवस बँका सुरू राहणार?



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : तुम्ही बँकेत कामासाठी जाण्याचा विचार करत असाल तर थांबा, आधीच फेब्रुवारी महिन्यात २८ दिवसांपैकी शनिवार रविवार पकडून १३ दिवस बँक बंद राहणार आहे. ह्या सुट्ट्या प्रत्येक राज्यांनुसार वेगवेगळ्या आहेत.आता बजेटमध्ये बँकेच्या कामाच्या तासांबद्दल महत्त्वाची घोषणा होऊ शकते. बँक कर्मचाऱ्यांना शनिवार रविवार सुट्टी द्यावी आणि ५ दिवसांचा आठवडा करावा ही मागणी कर्मचारी मागच्या काही वर्षापासून करत होते. आता यावर बजेटमध्ये मोठी घोषणा होण्याची शक्यता आहे.**

### वेळ आणि नियम बदलणार?

सध्या बँक महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या शनिवारी बंद राहते. बँक कर्मचाऱ्यांना अर्थसंकल्पात दिलासा मिळण्याची शक्यता आहे. बँका आठवड्यातून फक्त पाच दिवस सुरू राहतील. देशातील करोडो बँक ग्राहकांसाठी बँक शाखा उघडण्याची आणि बंद करण्याची वेळ बदलणार आहे, कामाचे तास वाढतील आणि पाच दिवसांचा आठवडा केला जाऊ शकतो. अर्थसंकल्पातील या महत्त्वाच्या निर्णयाला सरकार मान्यता देते की नाही, हे १ फेब्रुवारीला कळणार आहे. १ फेब्रुवारी रोजी अर्थमंत्री निर्मला सीतारामन आपला अर्थसंकल्प सादर करणार आहेत.

बँक कर्मचारी आणि संघटना अनेक दिवसांपासून सरकारकडे पाच दिवसांचा आठवडा करण्याची मागणी करत आहेत. जर या निर्णयाला मंजुरी मिळाली तर बँक कर्मचाऱ्यांना दररोज शाखेत ४० मिनिटे जादा काम करावं लागेल. त्यानंतर दर आठवड्याला शनिवार आणि रविवारी बँकांच्या शाखा बंद राहतील. आतापर्यंत बँकांमध्ये पहिल्या आणि तिसऱ्या शनिवारी काम होते. दुसऱ्या आणि चौथ्या शनिवारी बँका बंद राहात होत्या.

बँक कर्मचाऱ्यांना महिन्याभरात ६ ऐवजी ८ सुट्ट्या मिळणार आहेत.

बँक कर्मचारी एका महिन्यात ६ सुट्ट्यांऐवजी ८ सुट्ट्यांची मागणी करत आहेत. यासाठी बँक कर्मचारी संघटना आणि इंडियन बँक्स असोसिएशन (खइअ) यांच्यात करार झाला आहे. आता हे संपूर्ण प्रकरण सरकार आणि आरबीआयच्या मंजुरीची वाट पाहात आहेत. बँक कर्मचारी संघटना, आरबीआय आणि सरकारी अधिकारी यांच्यात बँकांमध्ये १५ दिवस काम करण्याबाबत अनेक चर्चा झाल्या आहेत. मात्र, आता या संपूर्ण प्रकरणाला आरबीआय आणि सरकारची मंजुरी मिळणे बाकी आहे. त्यानंतरच देशातील सर्व बँकांमध्ये ५ दिवस काम २ दिवस सुट्टी हा नियम लागू होईल.

बँकिंग कामकाजाच्या तासात वाढ झाल्यामुळे ग्राहकांना सेवा मिळण्यात अडचण येणार नाही, असा दावा युनियनकडून करण्यात आला आहे. ५ दिवस बँकांमध्ये काम केल्यामुळे लोकांना त्यांचे काम पूर्ण करण्यात अडचणी येऊ शकतात. विशेषत: जे काम करत आहेत, जे शनिवारी आपले काम पूर्ण करतात. त्यांना काम पूर्ण करण्यासाठी शनिवार मिळणार नाही. केवळ ५ दिवसांच्या आत हे काम पूर्ण करावे लागणार आहे.

**बँक शाखा उघडण्याची आणि बंद करण्याची ही नवीन वेळ असेल?**

- नवीन नियमांनुसार, बँकिंग तासांमध्ये ४०-४५ मिनिटे वाढ होऊ शकते.
- सध्याचे वेळापत्रक: बहुतांश बँका सकाळी १०:०० ते संध्याकाळी ४:०० वाजेपर्यंत ग्राहकांसाठी खुल्या असतात.

**नवीन वेळापत्रक (प्रस्तावित)**

- सकाळी ९:४५ वाजता बँक सुरू होईल. (१५ मिनिटे लवकर)
- संध्याकाळी ५:३० वाजता बँक बंद होईल. (३० मिनिटे उशिरा)

सरकारने या प्रस्तावाला मंजुरी दिल्यास बँका ४० मिनिटे अतिरिक्त उघडतील. बँकेच्या शाखा सकाळी ९.४५ वाजल्यापासून सुरू होतील. जे सकाळी १० वाजता सार्वजनिक व्यवहारासाठी खुले होते. म्हणजेच बँकेची शाखा नियमित वेळेच्या १५ मिनिटे आधी लोकांसाठी उघडेल. सायंकाळी साडेपाचपर्यंत बँकेची शाखा बंद राहणार आहे. जे सध्या ५ वाजेपर्यंत बंद होते. सध्या बहुतांश बँका सार्वजनिक व्यवहारासाठी सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत उघडल्या जातात. युनियन्सचे म्हणणे आहे की ५ दिवस कामकाजाच्या अंमलबजावणीचा ग्राहक सेवेवर परिणाम होणार नाही. बँक कर्मचाऱ्यांचे कामाचे तास दररोज सुमारे ४० ते ४५ मिनिटांनी वाढवता येतात.

## मुंबई हादरली! दादर स्टेशनला उभ्या असलेल्या गाडीत आढळला मृतदेह

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईच्या दादर परिसरातून धक्कादायक बातमी समोर आली आहे. दादर स्टेशनला उभ्या असलेल्या लांब पल्ल्याच्या गाडीत मृतदेह आढळला आहे. ही घटना रणकपूर एक्स्प्रेसमध्ये घडली आहे. ही एक्स्प्रेस राजस्थानमधून दादरला रवाना होते. या घटनेने दादर परिसर हादरून गेला आहे.

दादर स्थानकात उभ्या असलेल्या लांब पल्ल्याच्या रणकपूर एक्स्प्रेसच्या टॉयलेट मध्ये एक बेवारस मृतदेह आढळला. या व्यक्तीने टॉवेलच्या सहाय्याने गळा आवळून आत्महत्या केली असल्याचा पोलिसांचा संशय आहे. रणकपूर एक्स्प्रेस दादर स्टेशनवर उभी असताना आरपीएफकडून रेल्वेची तपासणी करण्यात आली. बराच वेळ टॉयलेटचा दरवाजा न उघडल्याने आरपीएफ जवानांनी एक्स्प्रेसच्या डब्ब्यातील टॉयलेटचा दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला.शेवटी दरवाजा तोडण्यात आला. यानंतर चक्क टॉयलेटमध्ये मृतदेह दिसला.

पोलीस या व्यक्तीबद्दल अधिकचा तपास करत असून या मृतदेहाच्या आजूबाजूला अद्यापही ओळखपटण्याजोगे कोणतेही पुरावे सापडले नाही आहेत.

## मृत्यूचा खेळ पुन्हा रंगणार! स्क्विड गेम ३ची रिलीज डेट जाहीर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षित कोरियन वेब सीरिज स्क्विड गेमचा पार्ट २ नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाला. या सीरिजला प्रेक्षकांनी प्रचंड प्रतिसाद दिला असून जगभरात धुमाकूळ घातला आहे. मात्र या सीझन २चा पुढील भाग कधी प्रदर्शित होणार याची चर्चा सुरु होती. दरम्यान, स्क्विड गेम निर्मात्यांनी स्क्विड गेम ३ ची रिलीज डेट जाहीर केली आहे.

नेटफ्लिक्सने सोशल मीडियावर स्क्विड गेम सीझन ३ चा फोटो शेअर केला आहे. यामध्ये 'झीशरिश ङ्गी ऋळपरश्र ऋाश' म्हणजेच 'अंतिम खेळासाठी तयार राहा' असे कॅप्शन लिहले आहे. त्याचबरोबर २७ जून २०२५ रोजी स्क्विड गेम सीझन ३ प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याचे सांगितले आहे.

'स्क्विड गेम ३' चे दिग्दर्शक, लेखक आणि निर्माता ह्वांग डोंग-ह्युक यांनी एक निवेदन जारी केलं होतं. यामध्ये ' स्क्विड गेम ३ ची बातमी शेअर करण्यासाठी मी हे पत्र लिहिण्यास खूप उत्सुक आहे. या कथेच्या शेवटी नवीन स्क्विड गेम तयार करण्यासाठी लावलेले बीज वाढताना आणि ते फळ घेत असल्याचे पाहून मला खूप आनंद होत आहे. आम्ही तुमच्यासाठी आणखी एक मनोरंजक मालिका आणण्याचा प्रयत्न करू', असे म्हटले आहे. दरम्यान, स्क्विड गेम वेब सीरीजचे दोन सीझन धमाकेदार ठरल्यानंतर आता तिसऱ्या सीझन पाहण्यासाठी प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत असल्याचे दिसत आहे.

## पिंपरीत ३६ वर्षीय युवकाचा जीबीएसमुळे मृत्यू

**पिंपरी चिंचवड /प्रतिनिधी :** पिंपरी चिंचवडमध्ये गुईलेन बॅरे सिंड्रोम या आजारामुळे पिंपळेगुरव परिसरातील एका ३६ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला आहे. या रुग्णावर महापालिकेच्या संत तुकाराम नगर येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात उपचार सुरू होते. विशेष म्हणजे युवकाला जीबीएसनंतर न्यूमोनियाचीही लागण झाली होती. यावेळी उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला आहे. या मृत्यूने पिंपरी चिंचवडमध्ये खळबळ माजली आहे.

पिंपळेगुरव परिसरात वास्तव्यास असलेल्या ३६ वर्षीय युवकाला २१ जानेवारी रोजी गुईलेन बॅरे सिंड्रोम या आजाराची लागण झाली होती. या रुग्णावर महापालिकेच्या संत तुकाराम नगर येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात उपचार सुरू होते. या रूग्णाला गुईलेन बॅरे सिंड्रोम नंतर न्यूमोनियाचीही लागण झाली होती. उपचारादरम्यान ३० जानेवारी रोजी या रुग्णाचा मृत्यू झाला आहे. युवकाचा मृत्यू नेमका कोणत्या आजारामुळे झाला,

## जिल्हा पोलीस दलातर्फे युवकांसाठी मिशन सक्षम मोहीम







दैनिक आपला विदर्भ

**नंदूरबार/प्रतिनिधी :** जिल्हा पोलीस दल व प्रथम संघटनाच्या वतीने जिल्हातील युवकांना चांगले मार्गदर्शन मिळून रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी मिशन सक्षम मोहीम जिल्ह्यात राबवण्यात येत आहे. जिल्हा पोलीस मुख्यालय येथे जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस यांच्या हस्ते मिशन सक्षमचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक आशित कांबळे, उपविभागीय पोलीस अधिकारी संजय महाजन यासह प्रथम संघटनाचे अधिकारी उपस्थित होते. १८ ते ३५ वर्ष वयोगटातील युवकांना आपल्या कौशल्या नुसार ४५ दिवसाचे प्रशिक्षण प्रथम संघटने कडून देण्यात येणार आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर चांगल्या कंपनीत नोकरी किंवा आपला स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यास प्राधान्य राहणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना आपल्या आवडत्या फिल्ड नुसार प्रशिक्षण देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील इच्छुक विद्यार्थी व विद्यार्थिनी ज्यांना अशा प्रकारचे प्रशिक्षण घ्यायचे असेल त्यांनी जिल्हा पोलीस मुख्यालय येथे संपर्क करावा. दोन दिवसात पहिली बॅच रवाना होणार असून पहिल्या बॅच साठी जवळपास २५० युवकांनी फार्म भरले आहेत. मुलांना चांगले मार्गदर्शन होऊन त्यांच्या जीवनात परिवर्तन व्हावे यासाठी ही संकल्पना पोलीस दला कडून राबविण्यात आली असल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस यांनी सांगितले.

## अखेर जरांगे पाटील यांचे उपोषणाचे हत्यार म्यान, आता होणार सरकारशी समोरासमोरची लढाई

**जालना/प्रतिनिधी :** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षण अंमलबजावणीसाठी सातव्यांदा अंतरवाली सराटीत आमरण उपोषण सुरू होते. काल सहाव्या दिवशी हे उपोषण मागे घेण्यात आले. यावेळी ते म्हणाले की, आमरण उपोषण स्थगित करतोय. आता यापुढे उपोषण होणार नाही, तर आता समोरासमोर लढाई लढणार. मराठा आरक्षणासाठी बलिदान दिलेल्या कुटुंबाला १० लाख रुपये देऊन त्यांना सरकारी नोकरीत घ्या. काही झाले तरी आम्हाला सगे सोयरे अधिसूचनेची अंमलबजावणी पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. सरकार दगा फटका करणार नाही असं वाटतं. जर मागण्यांची अंमलबजावणी झाली नाही तर मी मुंबईला जायची तारीख जाहीर करणार असं सांगून जरांगे पाटील यांनी सरकारला कडक इशारा दिलाय.

## आजपासून महाराष्ट्रातील सगळ्या पोर्टवर आधार कार्ड अनिवार्य

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्याची सागरी सुरक्षा अत्यंत महत्त्वाची असल्याने राज्यातील सागरी क्षेत्रात मासेमारीसाठी जाणाऱ्या प्रत्येक खलाशांकडे जठ उेवशव आधार कार्ड जवळ बाळगणे आवश्यक आहे. तसेच इंडियन मर्चंट शिपिंग ॲक्टच्या, १९५८ मधील ४३५ (८) मधील तरतूदीनुसार व महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ व (सुधारीत २०२१) कलम ६ (४) नुसार भारतातील मासेमारी नौकेचा नोंदणी क्रमांक नौकेवर कायम स्वरूपी दिसेल असे रंगविणे आवश्यकच्या असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी मत्स्यव्यवसाय विभागाला यासंबंधी निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने सागरी सुरक्षेच्या दृष्टीने मासेमारी नौकेवरील प्रत्येक खलाशांने स्मार्ट कार्ड ठठ उेवशव आधार कार्ड जवळ बाळगणे बंधनकारक राहील. नौकेचा नोंदणी क्रमांक नौकेच्या मागील (वरच्या) भागात दोन्ही बाजूने स्पष्टपणे दिसेल तसेच नौकेच्या केबीनच्या छतावर कोरून रंगविणे बंधनकारक राहील, असे निर्देश मत्स्यव्यवसाय विभागाचे आयुक्त यांनी दिले आहेत.

जिल्ह्यातील सर्व मच्छिमार सहकारी संस्थांना कळवून याबाबत सर्व मासेमारी नौका मालकांस अवगत करून खलाशांनी ठठ उेवशव आधार कार्ड अथवा स्मार्ट कार्ड जवळ बाळगणे, तसेच नौकेचा नोंदणी क्रमांक नौकेच्या मागील (वरच्या) भागात दोन्ही बाजूने स्पष्टपणे दिसेल, तसेच नौकेच्या केबीनच्या छतावर कोरून रंगविणे बाबतची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी. सदर अटी-शर्तींची परिपूर्णता झाल्याशिवाय, कोणत्याही नौकेचा मासेमारी परवान्याचे नुतनीकरण व मासेमारी टोकन निर्गमित करु नये, अशा नौका ज्या नोंदणी क्रमांक व कलर कोडचे ठळक पणे प्रदर्शित करीत नाहीत व नौकेवरील खलाशांकडे, ठठ उेवशव आधार कार्ड अथवा स्मार्ट कार्ड आढळून येत नाहीत. अशा नौका मालकांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ (सु-२०२१) अंतर्गत मासेमारी परवाना अटी-शर्तींचा भंग म्हणून मासेमारी परवाना रद्द करण्याबाबत नियमोचीत कार्यवाही करण्यात यावी व करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यात यावा, असे आदेश मत्स्यव्यवसाय आयुक्त किशोर तावडे यांनी दिले आहेत.

या आदेशाद्वारे, ठाणे, पालघर, मुंबई उपनगर, मुंबई शहर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग विभागांना सूचित करण्यात आले आहे की, आदेशात नमूद केल्याप्रमाणे याबाबत अंमलबजावणी करुन त्याप्रमाणे अहवाल मुख्यालयास सादर करावा अन्यथा आपल्यावर नियमोचीत कारवाई प्रस्तावीत करण्यात येईल, असे त्यांच्या पत्रकात म्हटले आहे.

## बुलडाणा जिल्ह्यांतील ६४ हजार कुटुंबांचे होणार घरकुलांचे स्वप्न साकार

### केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या अथक प्रयत्नाना यश

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या अथक प्रयत्नांमुळे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत बुलडाणा जिल्ह्याला सन २०२५ - २६ साठी ६४१५५ घरकुलांचे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे त्यामुळे जिल्ह्यातील ६४ हजार कुटुंबाच्या घरकुलांचे स्वप्न साकार होणार आहे.

प्रत्येकाला आपलं सुंदर असं घर असावं अशी मनोमन इच्छा असते परंतु आर्थिक परिस्थितीमुळे अनेकांना घराच स्वप्न साकारल्या जात नाही . पण अश्या गरजूना केंद्र सरकारच्यावतीने प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आर्थिक





मदत दिल्या जाते .यामध्ये बुलडाणा तालुक्यासाठी ४६५१, मोताळा ४२२७, चिखली ८२१३, मेहकर ८२०८, लोणार ३५९६, सिंदखेड राजा ६२५२, देऊळगाव राजा २८२७, खामगांव ७१४९, शेगाव २३४२, मलकापूर ३४३२नांदुरा ४८०८, जळगांव जामोद ३९७६ आणि संग्रामपूर तालुक्यासाठी ४४७४ घरकुलांचे उद्दिष्ट प्राप्त झाल्याने एकाच आर्थिक वर्षात ६४१५५ कुटुंबांना आता स्वतःचे , हक्काचे घर मिळणार आहे

### घरकुलासाठी कुणीही आर्थिक व्यवहार करू नये-केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव

बुलडाणा जिल्ह्यासाठी पंतप्रधान आवास योजने अंतर्गत मोठ्या प्रमाणात उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. प्रत्येक लाभार्थी कुटुंबाला प्रतीक्षा यादी प्रमाणे याचा लाभ मिळणार आहे. तालुका स्तरावरून ग्राम पंचायतस्तरावर ही थेट उद्दिष्ट दिलेले असल्याने ग्राम पंचायतीना मिळालेल्या घरकुलांच्या उदिष्टाप्रमाणे लाभार्थ्यांना लाभ द्यावा लागणार आहे. आवश्यक ती कागद पत्रे, आणि अटी व शर्तीची पूर्तता करावी लागणार आहे. त्यामुळे प्रतीक्षा यादीतील शिल्लक राहिलेल्या कुटुंबांना घरकुले मिळणार असल्याने कुणीही आर्थिक व्यवहार करू नये असे आवाहन देखील केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले आहे.

### जिल्ह्याला मोठे उद्दिष्ट मिळाल्याने प्रधानमंत्री आवास योजनेची प्रतीक्षा यादी अर्ध्यावर येणार

प्रधानमंत्री आवास योजनेत एव्हढ्या मोठ्या प्रमाणात उद्दिष्ट मिळण्याची ही पहिलीच वेळ आहे. बुलडाणा जिल्ह्याला आतापर्यंत एवढ्या मोठ्या घरकुलांचे उद्दिष्ट कधीच मिळाले नाही. बुलडाणा जिल्ह्यातील घरकुलांची प्रतीक्षा यादी ही १ लाख १२ हजार एव्हढी आहे. दरवर्षी कमी उद्दिष्ट प्राप्त होत असल्याने प्रतीक्षा यादी हळूहळू कमी होत होती. या वर्षी पहिल्यांदाच मोठी उद्दिष्ट प्राप्ती झाल्याने प्रतीक्षा यादी अर्ध्यावर येणार आहे. त्यामुळे उर्वरित प्रतीक्षा यादीतील लाभार्थ्यांना पुढील वर्षी पर्यंत लाभ देऊन १००% प्रतीक्षा यादीमधील कुटुंबांना घरकुलाचा लाभ देण्याचा प्रयत्न आपला असणार आहे असे प्रतिपादन केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी यावेळी केले आहे.

CMYK

## केंद्र सरकारचा संशोधनावर भर...

प्रत्येक देशाच्या उद्योग विकासाच्या प्रगतीसह एकूणच अर्थकारणाला गती देण्यासाठी अभियांत्रिकी तंत्रज्ञानासह उद्योग प्रक्रियेला सातत्याने अधिकाधिक प्रगत व अद्ययावत करण्याची गरज असते. आपला देश पण त्याला अपवाद नाही. विशेषतः सद्यस्थितीत जागतिक स्तरावर वेगाने आपल्या विकासाची नोंद नोंदविणाऱ्या भारताच्या आर्थिक- औद्योगिक संदर्भात तर ही बाब विशेष महत्त्वपूर्ण ठरते. या महत्वपूर्ण पार्श्र्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नव्यानेच घोषित केलेल्या देशाची संशोधन क्षेत्रातील कामगिरी व योगदान विशेष गतिमान करण्यासाठी नॅशनल रिसर्च फाउंडेशन या नव्या मोहिमेचा नव्या संदर्भासह आढावा घेणे महत्त्वाचे ठरते. सकृतदर्शनी या नव्या संशोधनप्रधान मोहिमेसाठी आगामी ५ वर्षांसाठी ५० हजार कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये उद्योग व्यवसायाची नजिकच्या भविष्यासह आगामी काळातील गरजा लक्षात घेऊन व त्याचा अभ्यास करून भारताला संशोधन समृद्ध करण्यावर भर दिला जाणार आहे हे विशेष... योजनेच्या निमित्ताने पंतप्रधानांनी मांडलेली भूमिका म्हणजे आपण संशोधन क्षेत्रात केवळ पाश्र्चात्यांसह परकीयांचे अनुकरण करणेच पुरेसे नसून देशांतर्गतच नव्हे तर परदेशातील उद्योगांना आवश्यक अशा ज्ञान–तंत्रज्ञानाच्या गरजांची पूर्तता करण्याचे आव्हान यशस्वीपणे स्वीकारणे गरजेचे आहे. यासाठी त्यांनी आधुनिकता व कल्पकतेच्या आधारे विज्ञान- तंत्रज्ञानाच्या जोडीलाच अनुसंधान म्हणजेच संशोधनाची कास धरण्यावर भर दिला आहे. केंद्र सरकारचा संशोधनावर भर देणारा हा धोरणात्मक निर्णय अनेकार्थांनी महत्त्वाचा व दूरगामी स्वरुपात परिणामकारक ठरणारा आहे. यासंदर्भातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आज आपली आर्थिक- औद्योगिक प्रगती व परिस्थिती ही उत्साहवर्धक असली तरी त्याला अद्यापही संशोधनाची पुरेशी साथ मिळालेली नाही. याचाच परिणाम म्हणून भारताला प्रामुख्याने अमेरिकेसारख्या देशावर तंत्रज्ञानापासून अंतराळ संशोधनासारख्या महत्त्वपूर्ण विषयातील संशोधन व प्र ज्ञान मिळण्यासाठी अवलंबून रहावे लागते. ही बाब केवळ अडचणीची वा परावलंबित्वाचीच नव्हे तर जोखमीची सुद्धा शकते. तसे पाहता एरवी जागतिक पातळीवर सुद्धा चर्चेत असणारी अमेरिकन संशोधन पद्धती ही मुख्यत: संशोधन व त्याचे प्रकाशन याच पद्धतीवर भर देते. परिणामी तिकडे संशोधनाची भरमार असली तरी केवळ त्याच्या प्रकाशनावरच भर देण्यात येत असल्याने व त्याकामी त्या संशोधक–प्रकाशक मंडळींना भरपूर पैसा मोबदला मिळत असल्याने या संशोधनाचा उपयोग प्रत्यक्ष तंत्रज्ञान वा त्याच्याशी निगडीत उद्योग प्रक्रिया अधिक सुधारित वा प्रगत होण्यासाठी होतोच असे नाहे. अधिकांश संशोधनाचे संशोधन पत्रिकेमध्ये प्रकाशन वा त्यांचे संकलन इथवरच त्यांची मजल असते. त्यामुळेच इतर प्रगत अथवा प्रगतीशील देशांच्या तुलनेत संशोधन या विषयावर अमेरिका कैक पटींनी अधिक खर्च करीत असली तरी तेथील संशोधनाचा प्रत्यक्ष उपयोग अथवा उपयुक्तता मर्यादित स्वरुपातच राहते. याउलट आपल्याकडील 'दर्प' म्हणजेच अहिम –वरहम् ठिरीम्प् इ्दरामी –सहम्ब् सारखे उदाहरण विशेष उल्लेखनीय म्हणून देता येईल. या संशोधन प्रयोगाचे प्रमुख वैशिष्ट्या म्हणजे या संशोधनाचा मूळ विषय व मुख्य तपशील संगणकपद्धतीच्या माध्यमातून सार्वजनिक स्वरुपात संबंधितांच्या संदर्भ व अभ्यासासाठी उपलब्ध आहेत. त्याचा अभ्यासक–संशोधक या उभयतांना उपयोग होत असतो. संशोधनाचा गोषवारा संगणकीय पद्धतीने उपलब्ध करून देण्याचा हा पायंडा जागतिक संशोधनाच्या संदर्भात मान्यताप्राप्त ठरला आहे. याचेच प्रमुख उदाहरण म्हणजे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मद्रासद्वारा विशेष जागतिक पुढाकार स्वरुपात भारतीय उद्योग व शैक्षणिक संशोधन संस्थांच्या विशेष सहकार्यातून सुरु केलेल्या हेल्थकेअर टेक्नॉलॉजी इनोव्हेशन सेंटरचे उदाहरण देण्यात येते. या नव्या प्रयोगात उद्योगांचा अनुभव शैक्षणिक संस्थांचे ज्ञान व संशोधकांचे संशोधन या तिन्ही महत्त्वपूर्ण मुद्द्यांचा एकत्रित व एकात्मिक स्वरुपात अभ्यास होत असल्याने त्याचे दीर्घकालीन उपयोग व परिणाम आता जागतिक स्तरावर होताना दिसतात. चेन्नई येथे आयआयटीमध्ये प्रस्थापित झालेल्या व जागतिक स्तरावर सुद्धा सक्षमपणे काम करणाऱ्या 'एचटीआयसी' संशोधन केंद्राने अल्पावधीतच उल्लेखनीय काम केले असून त्यामध्ये संशोधनावर आधारित असे विकसित तंत्रज्ञ अद्ययावत पद्धतीने सर्वदूर पोहोचविण्याचा विशेष प्रयत्न करण्यात आला आहे. परिणामी देशांतर्गतच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर सुद्धा वैद्यकीय माहिती व त्याचा उपचार पद्धतीसाठी करता येणारा प्रयोग आणि उपयोग ग्रामीण वा दूरवरच्या वैद्यक उपचार केंद्रांप्रमाणेच मोबाईल म्हणजेच चालत्या फिरत्या वैद्यकीय केंद्रांना सुद्धा होऊ शकतो. मद्रास आयआयटीचे हे संशोधन जागतिक स्तरावर अशा प्रकारे क्रांतिकारी ठरले आहे. वैद्यक क्षेत्राशी संबंधित महत्त्वपूर्ण असे दुसरे उदाहरण म्हणून सुधा गोपालकृष्णन ब्रेन सेंटरच्या संशोधन काम उल्लेख केला जातो. या केंद्राने मेंदू विकार व त्यावरील विशेष उपचार या संदर्भात आर्टिफिशीयल इंटेलिजंस म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा आधार घेण्याचे नवे व उल्लेखनीय असे काम केले आहे. सुधा गोपलकृष्णन सेंटरच्या या संशोधनपर उपक्रमाने पाश्र्िचमात्य देशातील या क्षेत्रातील संशोधनावर मात तर केलीच, त्याशिवाय मेंदूशी निगडीत उपचार पद्धतीला पण मोठी चालना दिली. मुलभूत सुविधा व इमारत बांधकाम क्षेत्रात सुद्धा आयआयटी मद्रासने जागतिक स्तरावर उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. या तंत्रज्ञानाच्या नाविन्याला व संशोधनपर तंत्रज्ञानाला पाश्र्चात्य देशांनी आधीच दाद दिली आहे. मुख्य म्हणजे हे संशोधन पाश्र्चात्य देशांमध्ये अशा प्रकारच्या संशोधनासाठी येणाऱ्या खर्चाच्या तुलने कितीतरी पटींनी कमी आहे. याचाच आर्थिक विरोधाभास की काय पण आज जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय मुद्रा निधी व पाश्र्चात्य देशातील आर्थिक गुंतवणूक संस्था भारत आणि भारत सरकारला तंत्रज्ञान संशोधनावर अधिक खर्चाची गुंतवणूक करण्याचा अनाहूत व फुकाचा सल्ला देत आहेत. या पाश्र्िचमात्य संस्थांनुसार सद्यस्थितीत भारताची संशोधन क्षेत्रातील गुंतवणूक भारताच्या सकल घरेलू उत्पादन म्हणजेच जीडीपीच्या ०.६ टक्के आहे तर अमेरिकेची संशोधनावरील गुंतवणूक जीडीपीच्या २ टक्के तर चीनची तर ३ टक्के आहे याचा पण दाखला दिला जातो. अर्थात याठिकाणी भारताचा संशोधनावरील खर्च व गुंतवणूक तुलनेने कमी खर्चासह व प्रत्यक्षात अधिक कार्यक्षम स्वरुपात असते. या ऐतिहासिक व व्यावहारिक वस्तुस्थितीला मात्र या पाश्र्चात्य संस्थांकडून सोईस्करपणे बगल दिली जाते. प्रत्यक्षात आज भारतात सेमीकंडक्टरसह कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक तंत्रज्ञान, सेंसर्स, नॅनो–टेक्नॉलॉजी या अधिकांश क्षेत्रात भारताने यापूर्वीच संशोधन केले आहे. याशिवाय अंतराळ तंत्रज्ञान यासारख्या प्रगत व खर्चिक क्षेत्रात भारताने केव्हाच यशस्वी आघाडी घेतली आहे. परिणामी भारताच्या प्रचलित व प्रस्तावित संशोधन गरजा लक्षात घेता मर्यादित खर्चासह संशोधन करणे भारताला सहजशक्य आहे. याशिवाय आपल्या संशोधन क्षेत्राला शैक्षणिक क्षेत्र व संस्थांचे मुलभूत पण महत्त्वाचे सहाय्य मिळत असल्याने आपले संशोधन, कमी खर्चात होऊ शकते. पंतप्रधानांच्या नव्यानेच केलेल्या नॅशनल रिसर्च फाउंडेशनच्या संकल्पाने या विषयाला अधिक बळकटी लाभली आहे.

# अती दुर्गम मेळ जानुरी गाव आमदार सिद्धार्थ खरात यांनी घेतले दत्तक

दैनिक आपला विदर्भ





**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर तालुक्यातील मेळ जानुरी हे गाव अती दुर्गम भागात असून आज दिनांक ३१ जानेवारी रोजी येथिल काही महिला व नागरिक आमदार सिद्धार्थ खरात यांना भेटण्या साठी आले होते या मध्ये प्रामुख्याने विशाल खिल्लारे, सत्यभामा घेवंदे,लता खिल्लारे, कविता खिल्लारे,संगीता मिसाळ, मंगला पवार,अन्नपूर्णा गवई,निर्मला गवळी,शिलाबाई कंकाळ,नंदा मिसाळ,मनोज मिसाळ,सपना गवई,प्रकाश गवई,सुरज मिसाळ आले होते, त्यांनी त्यांच्या समस्यांचा पाढा वाचून दाखविला, देश एकीकडे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत आहे आणि दुसरीकडे ग्रामीण भागातील जनतेचे जन जिवन विस्कळीत आहे,वीज,रस्ते,पिण्यासाठी पाणी उपलब्ध नाही, आरोग्य सुविधा नाही, शिक्षणाची सोय उपलब्ध नाही,असे अतिशय डोंगरी भागात असलेलें मेळ जानुरी करांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी येथिल नागरिकांना विकासाच्या प्रवाहावर आणण्यासाठी आमदार सिद्धार्थ खरात यांनी आमदार आदर्श गाव योजने अंतर्गत दत्तक घेतले आहे. या गावात शासकीय निमशासकीय लोक कल्याणाच्या योजना राबवण्यासाठी,रस्ते, आरोग्य सुविधा,मूलभूत सुविधा, गाव आदर्श बनविण्यासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे विधान आमदार सिध्दार्थ खरात यांनी या वेळी केले.

शब्दांची पूजा करत नाही मी
माणसांसाठी आरती गातो,
ज्यांच्या गावात सूर्य नाही
त्यांच्या हातात उजेड देतो मी.

# ग्रामीण भागातील लाल मातीमध्ये अनेक अंतराष्ट्रीय खेळाडू निर्माण झाले आहेत : किशोर पाटील गव्हाड

## अंबासी येथील कबड्डी स्पर्धेचे मोहन पाटील धोटे यांच्या हस्ते उदघाटन



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** जय बजरंग कबड्डी संघ जय बिरसा कबड्डी संघ अंबासी तालुका मेहकर आणि गावकरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अंबासी येथील कबड्डी स्पर्धेचे ३० जानेवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज आणि विर बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पुजन करून युवा नेते तथा अंबिका अर्बनचे संस्थापक अध्यक्ष मोहन पाटील धोटे, यांच्याहस्ते थाटात उदघाटण करण्यात आले यावेळी शिवसेना नेते किशोर पाटील गव्हाड यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी बोलतांना ते म्हणाले की ग्रामीण भागातील लाल मातीमध्ये अनेक राष्ट्रीय अंतराष्ट्रीय कबड्डी खेळाडू निर्माण झाले आहेत त्यामुळे ग्रामीण भागात सुद्धा स्पर्धांचे आयोजन मोठ्या प्रमाणात होण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. याप्रसंगी भास्कर शिंदे सोनू व्यहारे, पंढरी गायकवाड, सुरेश पाटील पंढरी काळे, गणेश टाले, कैलास खरात, पत्रकार अमर राऊत, कुंडलीक झळके, राजू संतोष गायकवाड मनोहर गाडे सुमीत शिंदे, विष्णू शिंदे, किरण लोखंडे महादेव शिंदे, विजय शिंदे, विजय शिंदे, गजानन यादव, संदीप जाधव गजानन साखरे, अशोक लोखंडे देवानंद साखरे, धोंडीराम शिंदे, राजू धंदारे ,गजानन सानप, शेषराव बोरकर, महादेव विघ्ने, ताराभाऊ दहिभाते, गोपाल राठोड, अण्णा शेळके, सचिन वाकळे, श्याम दहीभाते यांच्यासह कबड्डी खेळाडू गावकरी उपस्थित होते.

# ज्या बिकिनी सीनमुळे फेमस झाली सई ताम्हणकर, त्या सिनेमाचा येतोय सिक्केल, फर्स्ट लुक आऊट

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी अभिनेत्री फार बोल्ड लुक्स किंवा सीन्समध्ये दिसत नाहीत. पण १३ वर्षांआधी आलेल्या एका सिनेमात अभिनेत्री सई ताम्हणकरने थेट बिकिनीत सीन दिला आणि सगळ्यांचं लक्ष वेधलं. सई ताम्हणकरचा तो बिकिनी प्रचंड चर्चेत आला होता. सई ताम्हणकरला त्या सीनमुळे लोकप्रियता मिळाली होती. सईच्या त्याच सिनेमाचा आता सिक्केल प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सिनेमाचा पहिला लुक नुकताच समोर आला.

आपण ज्या सिनेमाबद्दल बोलतोय तो सिनेमा म्हणजे 'नो एंट्री पुढे धोका आहे' या सिनेमाचा सिक्केल प्रेक्षकांच्या भेटीला येतोय. सिनेमातील कलाकारांची धमाल आणि 'जपून जपून जा रे' या गाण्यानं प्रेक्षकांना वेड लावलं होतं. अभिनेता अंकुश चौधरी याने त्याच्या वाढदिवसाच्या दिवशी या सिनेमाच्या सिक्केलची म्हणजेच 'नो एंट्री पुढे धोका आहे २ – कॉमेडी ऑफ टेरर्स' ची सोशल मीडियावर घोषणा केली आहे.

सध्या बॉलिवूड, हॉलिवूड, टॉलिवूडमध्ये फ्रेंचाइजीचा ट्रेंड असून मराठीतही हा ट्रेंड रूजू लागला आहे. प्रेक्षकांना असे चित्रपट आवडतात. म्हणूनच 'नो एंट्री पुढे धोका आहे २ – कॅामेडी ाफ टेरर्स ' डबल धमाल घेऊन पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

या सिनेमाचं दिग्दर्शन अंकुश चौधरी करणार आहे. पोस्टरमध्ये स्टायलिश लूकमधील अंकुश चौधरी दिसत असून त्याच्या बाजूला दोन मुली दिसत आहेत. ज्या अर्ध्या मुलीच्या रूपात आहेत तर अर्ध्या रोबोटच्या रूपात आहेत.सध्यातरी या चित्रपटात कोण कलाकार असतील, हे गुलदस्त्यात आहे. खास करून अभिनेत्री सई ताम्हणकर यात दिसणार का याकडे सर्वांचं लक्ष लागून आहे. तरी हा चित्रपटही बॉक्स ऑफिस गाजवणार. त्यामुळे यात आधुनिक तंत्रज्ञानाची जादू पाहायला मिळणार हे नक्की.

# शेतकऱ्यांनो, ई-नाम प्रणालीव्दारे शेतमालाची विक्री करा

- ३० हजार शेतकऱ्यांची नोंदणी
- ३५ लाख क्विंटल शेतमालाच्या विक्री
- १३०० कोटी रुपयांची उलाढाल

दैनिक आपला विदर्भ




**बुलडाणा/प्रतिनिधी :** कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांच्या मालाची विक्री अधिक पारदर्शक व शेतकरी हिताची होण्यासाठी केंद्र शासनाच्या वतीने ई–नाम योजना सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील सात कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांना ई–लिलाव पद्धतीने शेतमाल विक्री करण्याची सुविधा उपलब्ध झाली असून आतापर्यंत सुमारे ३० हजार शेतकऱ्यांनी ई–नाम प्रणालीवर नोंदणी केली आहे. वर्षाअखेर जवळजवळ ३५ लाख क्विंटल शेतमालाची विक्री झाली आहे. यातून सुमारे १३०० कोटी रुपयांहून अधिक रकमेची उलाढाल झाली असून शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाला योग्य भाव मिळण्यास मदत होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी हमीभाव व बाजारभावासाठी नजीकच्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ई–नाम प्रणालीवर नोंदणी करुन जास्त भाव देणाऱ्या व्यापाऱ्याकडे शेतमाल विक्री करावा, असे आवाहन सहकारी संस्थाचे जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण यांनी केले.

बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर, खामगांव, शेगांव, नांदुरा, मेहकर, चिखली, लोणार या सातही कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये राष्ट्रीय कृषि बाजार(ई–नाम) योजना कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. त्यापैकी मलकापूर, खामगांव, शेगांव बाजार समितीमध्ये ३० हजार ७४४ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. तर नांदुरा, मेहकर, चिखली, लोणार बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांची नोंदणीची कारवाई सुरु आहे.

ई–नाम योजनेंतर्गत सातही बाजार समितीमध्ये वर्षाअखेर ३४ लाख ९९ हजार ९८० क्विंटल शेतमालाची विक्री झाली आहे. यातून सुमारे १३६३ कोटी ९७ लाख ८२ हजारांहून अधिक रकमेची उलाढाल झाली आहे. यामध्ये चिखली बाजार समिती येथे १५११६३.०७ क्विंटल विक्री झाली असून एकूण किंमत ७६ कोटी ९५.२७ रुपये आहे. खामगांव बाजार समितीमध्ये ७३३८६०.०४ क्विंटल विक्रीतून ३९८ कोटी २७.७५ रुपये, लोणार येथे २१३९६.५६ क्विंटल विक्रीतून ८ कोटी ३३.०१ रुपये, मलकापूर येथे २४८४९८०.६७ क्विंटल विक्रीतून ८३४ कोटी ६२.९४ रुपये आहे. मेहकर येथे ३.५८ क्विंटल विक्रीतून १६ हजार रुपये, नांदुरा बाजार समिती येथे १७.२२ क्विंटल विक्रीतून ७३ हजार रुपये तर शेगांव बाजार समितीमध्ये १०८५५८.८९ क्विंटल विक्री झाली आहे, अशी माहिती जिल्हा उपनिबंधक यांनी दिली.

राज्यस्तरावर महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ पुणे यांचेमार्फत नाम योजनेची अंमलबजावणी करण्यात येते. सदर योजनेची स्वतंत्रपणे वेबसाईट तयार करण्यात आलेली असून https://www.enam.gov.in या वेबसाईटवर योजनेची परिपूर्ण माहिती उपलब्ध आहे. तसेच राष्ट्रीय कृषि बाजार(ई–नाम) योजनेचे स्वतंत्र पोर्टल असून, सदर पोर्टलवर योजनेत समाविष्ठ कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत धान्यांची आवक व दैनंदिन शेतमाल भावांची माहिती उपलब्ध आहे. त्यामुळे देश व राज्यातील शेतकरी, खरेदीदार, विक्रेते यांना एका ठिकाणावरुन व्यापाक प्रमाणात शेतीमालाबाबत माहिती प्राप्त होऊन, शेतमालाची खरेदी विक्री करण्यात येते.

ई–नाम योजनेचे फायदे : लिलाव प्रक्रियेमध्ये पारदर्शकता, सुसुत्रता व अधिक स्पर्धा निर्माण होते. शेतकऱ्यांना देशातील राज्यातील बाजार समित्यांमध्ये शेतमालाच्या विक्रीचा पर्याय उपलब्ध होतो. योजनेंतर्गत ई–ट्रेडिंग प्लॅटफॉर्ममुळे शेतमाल विक्री झालेल्या शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये पैसे जमा होतात. शेतमाला विक्री प्रक्रियेत सहभागी शेतकरी, आडते, व्यापारी यांचेमध्ये उचित समन्वय ठेवणे सुलभ होते. थेट खरेदी, खाजगी बाजार यांच्या स्पर्धेत राज्यातील बाजार समित्यांना टिकून राहण्यासाठी मदत होते. या प्रक्रियेमुळे वेळेची, पैशाची बचत होऊन, अनावश्यक बाबी टाळण्यास मदत होते.

नाम योजनेअंतर्गत शेतमालाचा ई–लिलाव होत असल्याने शेतकऱ्यांच्या मालाला लिलावाद्वारे जास्तीत जास्त बाजार भाव मिळण्यास मदत होते. त्यामुळे बुलढाणा जिल्हयातील सर्व शेतकऱ्यांनी आपल्या शेतमालाला ई–लिलावाद्वारे जास्तीत जास्त भाव मिळणेचे दुष्टीने कृषि बाजार (ई–नाम) पोर्टलला आपली नाव नोंदणी करावी व आपला शेतमाला बाजार समितीमध्ये विक्रीसाठी आणुन योजनेचा लाभ घ्यावा.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित


## संक्षिप्त...

### पोलिसांनी पाठवलेले नमुने आता अन्न औषध प्रशासन घेणार नाही विभागीय सहआयुक्त यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :**गुटखा, तंबाखू प्रतिबंधित पदार्थाच्या कारवाईत पोलिस विभागाने तपासणीसाठी पाठवलेले कोणतेही नमुने आता अन्न व औषध प्रशासन स्वीकारणार नाही असं छत्रपती संभाजीनगरचे विभागीय सह आयुक्त अर्जुन भुजबळ यांनी म्हटलंय.. राज्याच्या सहआयुक्त यांनी जारी केलेल्या परिपत्रकात उल्लेख असल्याच सांगत नमुने विश्लेषनासाठी स्वीकारले जाणार नसल्याचे देखील भुजबळ यांनी सांगितिले

### शेतकऱ्यांची कर्जमाफी करा,स्वाभिमानी शेतकरी संघटनेचं जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याच्या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर या,स्वाभिमानी शेतकरी संघटनेचं जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन ठिय्या आंदोलन करण्यात आलं. पीकविम्याची अग्रीम रक्कम देण्यात यावी. तसेच जिल्ह्यात सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीचं अनुदान मंजूर होऊनही शेतकऱ्यांना देण्यात आलेलं नाही त्यामुळे हे अनुदान तातडीनं शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात यावं अशी मागणीही स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून करण्यात आलं आहे.

### पीयूष गोयल यांच्या लोककल्याण कार्यालयाचे उद्घाटन



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भाजपचे ज्येष्ठ नेते वेदप्रकाश गोयल यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त राष्ट्र उभारणीला समर्पित केंद्रीय वाणिज्य मंत्री आणि उत्तर मुंबईचे खासदार पीयूष गोयल यांच्या लोककल्याण कार्यालयाचा उद्घाटन सोहळा शुक्रवारी पार पडला. कांदिवली पश्र्चिमेकडील एस. व्ही. रोडवरील बालासिनोर इमारतीत हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार, मंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार प्रकाश सुर्वे, योगेश सागर, मनीषा चौधरी आदी उपस्थिती होते.

### शक्तीपीठ महामार्गाला विरोध करत शेतकऱ्यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयावर काढला मोर्चा



दैनिक आपला विदर्भ

**परभणी/प्रतिनिधी :**राज्य सरकारने शक्तीपीठ महामार्ग बनविण्याचे जाहीर केले आहे मागील दोन दिवसापासून ज्या जमिनीवरून शक्तीपीठ महामार्ग जात आहे तेथील ग्रामपंचायतीमध्ये अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आले आहेत त्यामुळे शेतकरी प्रचंड चिडले आहेत. चिडलेल्या शेतकऱ्यांनी आज थेट जिल्हाधिकारी कार्यालयात गाठले संतप्त शेतकऱ्यांनी भव्य असा मोर्चा काढत जिल्हाधिकाऱ्यांना शक्तीपीठ महामार्गासाठी जमिनी देणार नाहीत असा थेट इशारा दिला. त्याचबरोबर त्यांनी निवेदनही दिले.

मागील दोन वर्षापासून शक्तिपीठ महामार्गाला परभणी जिल्हा सह राज्यांमध्ये विरोध होत आहे. यापूर्वी देखील शक्तीपीठ महामार्गाला विरोध म्हणून शेतकऱ्यांनी आंदोलने केली होती. पण आता ग्रामपंचायतच्या पटलावर अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर मात्र शेतकरी प्रचंड चिडलेले आहेत. कसले परिस्थितीत शक्तिपीठ महामार्गाला मी जमीन देणार नसल्याचा त्यांनी निर्धार व्यक्त केला आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर पडणार- आनंदराज आंबेडकर

दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी :** भिवंडी शहरातील फुले नगर रोडवर रिपब्लिकन सेना व रिपब्लिकन वाहतूक सेना कार्यालयाचे उद्घाटन रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. आनंदराज यांचे कार्यक्रमस्थळी जे सी बी च्या सहाय्याने फुलांची उधळण करत स्वागत करण्यात आले.या कार्यक्रमा दरम्यान अनेकांनी पक्ष प्रवेश केला यामध्ये महिलांचा सहभाग लक्षणीय होता.याप्रसंगी मोठ्या संख्येने पक्ष कार्यकर्ते उपस्थित होते.

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची सुनावणी आता २५ फेब्रुवारी रोजी होणार आहे तेथे ही याचा निकाल लागेल या बाबत साशंकता आहे. त्यामुळे नगरपालिका महानगरपालिका पंचायत समिती जिल्हा परिषद निवडणुका पुन्हा एकदा लांबणीवर पडणार असून त्या दिवाळी मध्ये होण्याची शक्यता आहे.मार्च मध्ये जर निकाल लागला तर सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यास वेळ लागणार आहे. तोपर्यंत पावसाळा येणार असल्याने त्या पुढे जातील.परंतु आम्ही महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी आमच्या पक्षबांधणीस आम्ही सुरवात केली आहे.

महाराष्ट्रातील राजकारण गचाळ झाल्याने महाराष्ट्राचा बिहार होतो का काय अशी भीती निर्माण झाली आहे.महाराष्ट्रात ज्या प्रमाणे खून खराबा




सुरू आहे ते अत्यंत भयानक आहे.वाळू माफिया व राख माफिया यांच्या टोळ्या प्रत्येक जिल्ह्यात झालेल्या दिसतात आणि त्यांची प्रचंड दादागिरी सुरू आहे.यामुळे सामान्य माणूस भयभीत झालेला आहे.लोकांना आता सुशासन हवे आहे.लोकांना आपली सुरक्षितता हवी आहे.त्यांना शांततेत आयुष्य जगायचे आहे.राज्यात मोठ्या बहुमताने आलेले सरकार ने ही शाश्वती जनतेला दिली पाहिजे अशी मागणी आनंदराज आंबेडकर यांनी केली आहे.

एकीकडे देशाला महासत्ता बनवण्याचे स्वप्न बघायचे व एकी कडे माणसा माणसा मध्ये भेद करायचा असे प्रकार सुरू आहेत.एकदा घर दुभंगले तर ते जोडता येत नाही.त्यामुळे बुरखा बंदी बाबत केल्या जाणाऱ्या मागण्या करून चुकीचे राजकारण केले जात आहे असा टोला नितेश राणे यांच्या बुरखा वक्तव्यावर लगावत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रथम भारतीय व शेवट पर्यंत भारतीय या वक्तव्यानुसार प्रत्येकाच्या मनात ही भावना रुजली पाहिजे.धर्म प्रत्येकाने घरात ठेवावा रस्त्यावर आल्यावर आपण भारतीय आहोत ही भावना देशातली प्रत्येक नागरिकांच्या मनात रुजली पाहिजे असे वक्तव्य केले.

## उरणच्या तीन ग्रामपंचायतींमध्ये गैरव्यवहार; ग्रामविकास अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** उरण तालुक्यातील तीन ग्रामपंचायतींमध्ये लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याची घटना उघड झाली आहे. लाखो रुपयांच्या अपहरण प्रकरणी ग्रामविकास अधिकारी वैभव पाटील यांच्या विरोधात उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान उरण तालुक्यातील केगाव, चाणजे, खोपटे- बांधपाडा या तीन ग्रामपंचायतींमध्ये वैभव पाटील हे ग्रामविकास अधिकारी म्हणून कार्यरत होते. मात्र कार्यरत असताना वैभव पाटील यांनी बनावट



कागदपत्रे, बिले, निधीचा विनियोग, नियमबाह्य खर्च, ग्रामपंचायतीची जमा झालेल्या रक्कम बँकेत भरणा न करणे, कामात मनमानी, हलगर्जीपणा करणे आदी गैरप्रकार केले असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी गटविकास अधिकार्यांकडे केलेल्या होत्या. याप्रकरणी गटविकास अधिकार्यांनी वैभव पाटील यांची चौकशी सुरू केली होती.

या चौकशीत तीनही ग्रामपंचायतींमध्ये लाखो रुपयांचा अपहार झाल्याचे आढळून आले असल्याचं निष्पन्न झाले. यानंतर ग्रामविकास अधिकारी वैभव पाटील यांच्यावर उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे तर पुढील तपास सुरू असल्याचं पोलिसांनी म्हटलं.

## कुंभमेळ्यात हरवलेली वृद्ध महिला वाराणसीत सापडली; पालकमंत्र्याची तत्परता

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** प्रयागराज येथे सुरू असलेल्या कुंभमेळ्यात हरवलेली वृद्ध महिला अखेर वाराणसी येथे सापडली आहे. पालकमंत्री ना. मकरंद पाटील आणि जिल्हा प्रशासनाच्या सततच्या प्रयत्नांमुळे आणि उत्तर प्रदेश सरकारच्या मदतीने तिला सुखरूप शोधण्यात यश आले. पालकमंत्री मकरंद पाटील यांनी याबाबत माहिती देत सांगितले की, महिलेचा तिच्या मुलासोबत फोनवर संवाद साधून दिला गेला आहे.

**घटनेचा तपशील:**

उषाबाई लक्ष्मण बोरले (मूलतः मलकापूर, बुलढाणा) या आपल्या सहकाऱ्यांसोबत कुंभमेळ्यासाठी प्रयागराज येथे गेल्या होत्या. मात्र, गर्दीमध्ये त्या हरवून गेल्या आणि त्यानंतर त्यांच्यासोबत गेलेल्या महिलेशीही संपर्क होऊ शकला नाही. यामुळे कुटुंबीयांमध्ये मोठी चिंता पसरली होती.

महिलेच्या बेपत्त्याची माहिती मिळताच पालकमंत्री ना मकरंद पाटील, बुलढाणा जिल्हा प्रशासन आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने उत्तर प्रदेश प्रशासनाशी संपर्क साधला. अखेर, समन्वयातून महिलेचा ठावठिकाणा वाराणसी येथे लागला.

**पालकमंत्री, प्रशासनाच्या तत्परतेने दिलासा**

पालकमंत्री मकरंद पाटील यांनी उत्तर प्रदेश सरकारशी समन्वय साधून महिलेचा शोध घेतला. पोलिसांनी तिला सुरक्षित स्थळी हलवून तिच्या कुटुंबीयांशी संपर्क साधण्यास मदत केली.

**जिल्ह्यातील नागरिकांच्या मदतीसाठी हेल्पलाईन**

या कुंभमेळ्यात सहभागी होण्यासाठी गेलेल्या जिल्ह्यातील नागरिकांच्या मदतीसाठी जिल्हा प्रशासनाने नियंत्रण कक्षाचे हेल्पलाईन क्रमांक जारी केले आहेत. जिल्ह्यातील नागरिकांनी मदतीसाठी नियंत्रण कक्षाच्या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

या कुंभमेळ्यातील आपत्कालीन स्थितीत प्रयागराज कंट्रोल रुम टोल फ्री क्रमांक १९२०, दुरध्वनी क्रमांक ०५२२-२२३७५१५ उपलब्ध केला आहे. तसेच मंत्रालयात नियंत्रण कक्ष स्थापन केले असून त्या संपर्क क्रमांक ०२२२२०२७९९० असा आहे. त्यासोबतच अमरावतीचे विभागीय आयुक्त कार्यालयातील नियंत्रण कक्षाच्या ०७२१२६६१३६४ या क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे. यासह जिल्हा पोलीस नियत्रंण कक्षाने. ०७२६२२४२४०० तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियंत्रण कक्षाचे दुरध्वनी क्रमांक ०७२६२२४२६८३ हा उपलब्ध केला आहे. प्रयागराज येथील कुंभमेळ्यात दर्शनासाठी गेलेल्या जिल्ह्यातील नागरिकांनी आवश्यकतेनुसार या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## सुलतानपूर विविध कार्यकारी सोसायटी संस्थेने घेतलेल्या बि.ओ.टी तत्त्वावर व्यापारी संकुल बांधकामाचे विरोधात



दैनिक आपला विदर्भ

■ अबुतालीब खान

**सुलतानपूर :** नागवंशी संघपाल पनाड यांच्या नेतृत्वामध्ये बांधकाम परवाना तात्काळ रद्द करण्यासाठी अतिक्रमण तारकांचे जिल्हा उपनिबंधक तथा जिल्हाधिकारी यांना तक्रार निवेदन. सुलतानपूर तालुका लोणार येथील विविध कार्यकारी संस्थेचे अध्यक्ष व सचिवांनी सर्व नियम धाब्यावर बसून व्यापारी संकुल बांधकामाचा परवाना मिळवला आहे. त्यामध्ये सोसायटीचे गोडाऊनच एफ- क्लास जागेवर असल्याचे पुरावे सुद्धा जिल्हा उपनिबंधक तथा जिल्हाधिकारी यांना दिले आहेत. सुलतानपूर ग्रामपंचायत ने सुद्धा कुठलाही ठराव नसताना बेकायदेशीर रित्या ना हरकत दिल्याचे पुरावे सुद्धा दिले आहेत. विविध कार्यकारी सोसायटी यांना मुळात जे अतिक्रमण धारक ४० ते ५० वर्षापासून अतिक्रमण करून छोटे-मोठ्या उद्योगधंद्याच्या माध्यमातून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात, त्या अतिक्रमण धारकांना सहकारी संस्थेला अतिक्रमण काढण्याचा कुठलाही अधिकार नसताना, अतिक्रमण धारकांना बेकायदेशीरित्या नोटीस देत, अतिक्रमण काढण्यासाठी धमक्या देत आहेत. या विरोधात नागवंशी संघपाल पनाड यांच्या नेतृत्वामध्ये, ग्रामपंचायत सदस्य संतोष शिंदे, शेख अमीर भाई व अतिक्रमणधारक दामू अण्णा सुरूशे, मधुकर खेत्रे, प्रदीप गाडेकर, गजानन झोरे, सिद्धेश्र्वर खरात, गजानन राजगुरू, राजु काळे, संतोष सुरूशे, बबन बिडवे, पांडुरंग गाडेकर, अशोक खरात, राजेश पाटील, राजू रिंढे , फुलचंद शिराळे, स्वाक्षऱ्या आहेत.

## ममता कुलकर्णींची किन्नर आखाड्यातून हकालपट्टी, महामंडलेश्वर पद काढून घेतले

**मुंबई/प्रतिनिधी :** ९०च्या दशकातील प्रसिद्ध अभिनेत्री ममता कुलकर्णी २५ वर्षांनी भारतात आली. तिने भारतात येताच महाकुंभमेळ्यात हजेरी लावली. महाकुंभमेळ्याला जाऊन तिने संन्यास घेतला आणि महामंडलेश्वर बनली. महामंडलेश्वर बनवल्यानंतर किन्नर आखाड्यात भांडण सुरू झाली. अवघ्या ४-५ दिवसात ममता कुलकर्णीची किन्नर आखाड्यातून हालपट्टी करण्यात आली आहे. तिच्याकडून महामंडलेश्नर ही उपाधी काढून घेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

संगम शहर प्रयागराजमधील किन्नर आखाड्याची महामंडलेश्वर ममता कुलकर्णी हिला आता महामंडलेश्वर पदावरून हटवण्यात आले आहे. याशिवाय आखाड्याचे लक्ष्मी नारायण त्रिपाठी यांच्याकडून आचार्य महामंडलेश्वर हे पदही काढून घेण्यात आले आहे.

## अंबागोपाल फाऊंडेशनच्या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री रामदास आठवलेंची फटकेबाजी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मी कधी आजारी पडत नाही, काय खाल्लं पाहिजे, काय पिले पाहिजे, हे मला माहिती आहे. मी तर पीत नाही, असा खुलासा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी मुंबईत केला आहे. अंबागोपाल फाऊंडेशनच्या वतीने आजपासून (३१ जानेवारी) कॅन्सरमुक्त भारतासाठी सुरू केलेल्या 'जगेगा भारत तो बचेगा भारत' या मोहीमेचे उद्घाटन आठवले यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी आठवलेंनी खास शेरोशायरीतून कॅन्सर संदर्भात जनजागृती केली.

अंबागोपाल फाऊंडेशनच्या वतीने क्शश्रळिपस जींी डेलळींशू क्शरश्र अर्थात क्जड्क या संकल्पनेवर आधारित 'जगेगा भारत तो बचेगा भारत' या मोहीमेला केंद्रीय राज्यमंत्री आठवलेंच्या उपस्थितीत सुरुवात झाली. यावेळी फाऊंडेशनचे संस्थापक डॉ. हरीश शेट्टी, वॉटर मॅन ऑफ इंडिया रॅमेन मॅगसेसे पुरस्कार विजेते डॉ. राजेंद्र सिंह, झिरो बजेट शेतीचे संकल्पक, पद्मश्री सुभाष पाळेकर




यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. या मोहीमेत सुमारे २ हजारांपेक्षा अधिक तरुण-तरुणींचा सहभाग लक्षवेधी ठरला.

फाऊंडेशनच्यावतीने कॅन्सरसंदर्भात जनजागृती करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे रामदास आठवले यांनी कौतुक केले. फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. हरीश शेट्टी यांचं कौतुक करतांना आठवले म्हणाले, जब आप पलट देंगे कॅन्सर के किताबों का पन्ना, तब आपको मदद करने आयेंगे डॉ. हरीश अन्ना.

भारतात कर्करोग रुग्णांची वाढती संख्या चिंताजनक असली तरी केंद्र सरकारकडून त्यासंदर्भात मोठ्या उपाययोजना सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. महिला आणि लहान मुलांमध्ये कर्करोगाचे वाढत्या प्रमाणाकडेही आठवलेंनी उपस्थितांचे लक्ष वेधले. फाऊंडेशनच्या क्जड्क संकल्पनेवरही आठवलेंनी शायरी केली.आपके दिल में अगर होगा होश, तो मत दे दो कॅन्सर को दोष कॅन्सरसह इतर आजारांपासून वाचण्यासाठी दैनंदिन व्यायामाबरोबरच खाण्यापिण्याच्या सवयींवरही आठवलेंनी भाष्य केलं. यावेळी आठवलेंनी स्वतःच्या सवयींविषयी माहिती दिली. ते म्हणाले, मी कधीही आजारी पडत नाही. कारण मला माहिती आहे, काय खाल्लं पाहिजे, काय पिलं पाहिजे, मी तर पीत नाही, मी तर फक्त स्वच्छ पाणी पितो, असं म्हणताच उपस्थितांमध्ये टाळ्यांचा हशा पिकला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी सत्तेत आल्यानंतर त्यांनी स्वच्छ भारत अभियान सुरु केले. पर्यावरणाचे संतुलन राहणे आपल्या आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे. त्यामुळेच पेड लगाव, पेड बचाव और कॅन्सर को देश से भगाओ, या मार्गाने आपण गेले पाहिजे, असे आवाहन आठवलेंनी उपस्थितांना केले. कॅन्सरमुक्त भारताची जबाबदारी ही आमची आहे. सरकार म्हणून आम्ही कॅन्सरवर नियंत्रण मिळविण्याचे प्रयत्न करत आहोत. अशावेळी डॉ. हरीश शेट्टींनी कॅन्सरमुक्त भारतासाठी सुरू केलेले प्रयत्न अनेकांसाठी प्रेरणादायी असल्याचे आठवले म्हणाले.

फाऊंडेशनच्या कॅन्सरमुक्ती संदर्भातील उपक्रमांचेही आठवलेंनी खास शायरीतून कौतुक केले. जो आपको हमेशा पुछता रहेगा हाल, उस फाऊंडेशन का नाम है अंबागोपाल.जो देश भर में फैल रहा है कॅन्सर का जाल, उसको खत्म करेंगे मोदीजी और अंबागोपाल

या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने युवावर्ग उपस्थित होता. त्यांच्यामध्येही व्यसनाधीनतेविषयी जागृती करण्यासाठी आठवलेंनी एक शेर म्हटला. अगर हम बंद कर देंगे नशा, तो जीवन सुंदर बनने की है आशा यावेळी आठवलेंनी राजकीय भाष्यही केले. आठवलेंची मोदी सरकारमध्ये वर्णी कशी लागली, याचा किस्सा आठवलेंनी शेरोशायरीतून उपस्थितांना सांगितला. उपस्थितांनीही आठवलेंच्या शायरीला मनसोक्त दाद दिली. पहले तो दे दिया था मुझे धोका मोदीजी ने दिया मुझे मंत्रिपद का मौका

अंबागोपाल फाऊंडेशनच्या कॅन्सरमुक्त भारताच्या उपक्रमाच्या पाठिशी असल्याचेही आठवलेंनी यावेळी सांगितले. आठवलेंच्या या हटके आणि शायराना अंदाजमधल्या भाषणाला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाट दाद दिली.

## विविध वृत्त...

### ३ फेब्रुवारीला लोकशाही दिन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. त्यानुसार फेब्रुवारी महिन्याचा लोकशाही दिन सोमवार, दि. ३ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे.

लोकशाही दिनासाठी तक्रारदारांनी उपस्थित राहावे, उपस्थित राहणे शक्य नसल्यास तक्रारी रजिस्टर पोस्टाने लोकशाही दिनाआधी जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचतील अशाप्रकारे पाठवावेत, असे उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे यांनी कळविले आहे.

### जागतिक कर्करोग दिनानिमित्त मोफत तपासणी व निदान शिबीर

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जागतिक कर्करोग दिनानिमित्त जिल्हा रुग्णालय बुलढाणा येथे दि. ४ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजेपासून सर्व वयोगटातील स्त्री पुरुषांची मोफत कर्करोग तपासणी व निदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीराचा नागरिकांनी व रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी यांनी केले आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग व जिल्हा रुग्णालय बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीरामध्ये स्तनाचा कर्करोग, स्त्री गर्भाशय कर्करोग, मुख कर्करोग रुग्णांची मोफत तपासणी केली जाणार असून कर्करोग तज्ज्ञ व स्त्रीरोग तज्ज्ञव्दारे तपासणी केली जाणार आहे. तरी या शिबीराचा लाभ घ्यावा.

### राज्य युवा पुरस्कारासाठी १५ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** राज्य युवा पुरस्कार क्रीडा विभागामार्फत राज्य युवा पुरस्कार सन २०२३-२४ या वर्षाकरीता नामांकने मागविण्यात आले आहे. अर्हता धारण करणाऱ्या युवक, युवती व संस्थांनी आपले नामांकन अर्ज, प्रस्ताव दि. १५ फेब्रुवारीपर्यंत सादर करावे, असे आवाहन, जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस.महानकर यांनी केले आहे.

राष्ट्र व राज्य निर्माणामध्ये युवकांची महत्वपूर्ण भूमिका असून मोठ्या संख्येने युवा वर्ग, संस्था राज्यात सामाजिक कार्य करीत आहेत. युवामध्ये असलेल्या सुप्तगुणांना वाव देणे, त्यांनी केलेल्या सामाजित कार्याला प्रोत्साहन देणे, त्यांचा गुणगौरव करणे आवश्यक आहे. राज्याचे युवा धोरण अंतर्गत युवांच्या सामाजिक कार्याचा गौरव करण्यासाठी राज्य युवा पुरस्कार शासन निर्णय दि. १२ जानेवारी २०१३ नुसार देण्यात येतात.

सन २०२३-२४ या वर्षात राज्यस्तरावर राज्य युवा पुरस्कार क्रीडा विभागाच्या क्षेत्रिय विभागस्तर नुसार प्रत्येक विभागातील १ युवक, १ युवती व १ नोंदणीकृत संस्था याना देण्यात येणार आहेत. या पुरस्काराचे स्वरुप युवक-युवती यांना रोख ५० हजार रुपये संस्थेस १ लाख रुपये तसेच गौरवपत्र, सन्मानचिन्ह असे राहणार आहे.

राज्य युवा पुरस्कारासाठी युवक अथवा युवा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्था यांची गत तीन वर्षामध्ये केलेल्या कामगिरीचे मुल्यांकन विचारात घेण्यात येणार असून राज्य युवा पुरस्कार सन २०२३-२४ साठी अर्ज दि. १५ फेब्रुवारीपर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात सादर करणे आवश्यक राहणार आहे. अर्जाचा नमुना जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय किंवा https:// sports maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहतील. राज्यातील जास्तीत जास्त युवा व युवा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्था यांनी पुरस्कारासाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन क्रीडा व युवक सेवा, संचालनालयाचे आयुक्त यांनी केले आहे.

### १८० किलो प्लास्टिक जप्त; गुप्त माहितीच्या आधारे मनपाची कारवाई

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकवर कारवाई सुरू असुन उपद्रव शोध पथकाद्वारे रामनगर येथील साई पान शॉप येथे कारवाई करून खर्ऱ्यासाठी वापरण्यात येणाऱ्या सुमारे १८० किलो प्लास्टिक पन्नी जप्त करण्यात आल्या तसेच संबंधितांवर ५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

बंदी असलेल्या व एकदाच वापर करता येणाऱ्या प्लास्टिकवर कारवाई करण्यासाठी आयुक्त तथा प्रशासक विपीन पालीवाल यांच्या निर्देशानुसार ८ टीम्स बनविण्यात आल्या आहेत. या सर्व चमूंद्वारे शहरात नियमित कारवाई करण्यात येते. यावेळेस सुद्धा या दुकानासंबंधी गुप्त माहिती मनपास प्राप्त झाली होती. प्लास्टीक साठा,पिशव्यांची माहीती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवण्यात येत असुन दिलेली माहीती खरी निघाल्यास ५ हजारांचे बक्षिस दिल्या जात असल्याने अनेक सुजाण व्यक्तींकडुन अवैध साठ्यासंबंधी तक्रारी मनपास प्राप्त होत आहेत. एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या वस्तूंचे उत्पादन, आयात, साठवणूक, वाहतूक, वितरण, विक्री व वापरावर राज्यात १ जुलै २०२२ पासून पूर्णपणे बंदी घालण्यात आली असुन महाराष्ट्र प्लास्टिक आणि थर्माकोल अधिसूचना २०१८ नुसार पाचशे रुपये जागेवरच दंड, संस्थात्मक पातळीवर ५ हजार रुपयांपर्यंत दंड,दुसऱ्यांदा वापर केल्यास १० हजार रुपये, तर तिसऱ्यांदा गुन्हा केला तर २५ हजार रुपये दंड आणि ३ महिन्यांच्या कारावासाची शिक्षा आहे. सदर कारवाई आयुक्त विपीन पालीवाल यांच्या मार्गदर्शनात अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील, उपायुक्त रवींद्र भेलावे व उपायुक्त मंगेश खवले यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणात डॉ. अमोल शेळके,स्वच्छता निरीक्षक शुभम खोटे,शुभम चिंचेकर,राहुल गगपल्लिवर, प्रफुल पोतराजे यांनी केली

# रस्ता सुरक्षा जनजागृती अभियान पोष्टरचे जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांच्या हस्ते विमोचन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्यावतीने दि. १ ते ३१ जानेवारी या कालावधीत रस्ता सुरक्षा महिना राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने नेहरु युवा केंद्रामार्फत रस्ता सुरक्षा अभियानातंर्गत दि. १७ ते २३ जानेवारी दरम्यान विविध जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले असून रस्ता सुरक्षा जनजागृती अभियान पोष्टरचे विमोचन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात नुकतेच करण्यात आले.




याप्रसंगी अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, नेहरु युवा केंद्राचे लेखा व कार्यक्रम पर्यवेक्षक अजयसिंग राजपूत, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनाचे जिल्हा समन्वयक डॉ. हनुमंत भोसले, श्री संत गजानन महाराज कॉलेज ऑफ फॉर्मसी व रासेयो कार्यक्रम अधिकारी पवन जगताप, जिजामाता महाविद्यालय एनसीसीचे लेफ्टनंट पवन ठाकरे, रासेयो कार्यक्रम अधिकारी गजानन लोहटे, नेहरु युवा केंद्राचे सेवानिवृत्त सहाय्यक धनंजय चाफेकर व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते.

भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाअंतर्गत असलेले नेहरु युवा केंद्र व राष्ट्रीय सेवा योजना, श्री संत गजानन महाराज कॉलेज ऑफ फॉर्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा जागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

उपप्रादेशीक परिवहन कार्यालय व वाहतूक शाखा पोलीस विभाग बुलढाणा यांच्या सहकार्याने अयोजित या अभियानात हेल्मेट व सीटबेल्टचा वापर करा, नशा करुन वाहन चालवू नका, अपघात प्रसंगी जख्मीना मदत करा, रस्ता सुरक्षा नियम पाळा असे संदेश पथनाट्यामध्यून राष्ट्रीय सेवा योजना व श्री संत गजानन महाराज कॉलेज ऑफ फॉर्मसी बुलढाणाच्या विद्यार्थ्यांनी दिला.

## आडगाव राजा येथील अवैध देशी-विदेशी, हातभट्टीची दारू विक्री बंद करा

**विमल बाई शिनगारे यांच्या सह महिलांनी दिले उपविभागीय पोलिस अधिकारी यांना निवेदन**

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप



**बिबी :** सिंदखेड राजा तालुक्यातील आडगाव राजा येथे गावांमध्ये देशी-विदेशी आणि हातभट्टी दारू विक्री होत आहे त्यामुळे गावांमध्ये या अवैध दारूमुळे प्रत्येक कुटुंबामध्ये कलह निर्माण झाला असून तरुण मुले सुद्धा व्यसनाच्या आहारी जात आहेत कुटुंबांमध्ये दारू पिऊन भांडणे होत आहेत त्यामुळे गावातील अवैध दारू विक्री तात्काळ थांबण्यात यावी याबाबत आडगाव राजा ग्रामपंचायत ने ग्रामसभा घेऊन अवैध दारू विक्री बंद करण्यात यावी यासाठी ठराव सुद्धा घेण्यात आला आहे गावामधे अवैध दारू विक्री मुळे कुटुंबामध्ये झगडे चालू आहेत यामुळे सदर दारू विक्री बंद करण्यात यावी यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी मनीषा कदम यांच्या कडे निवेदन देण्यात आले असून त्याचबरोबर ठाणेदार ब्रह्मदेव शेळके याना सुद्धा निवेदन देण्यात आले आहे आडगाव राजा येथील दारू बंद न झाल्यास आक्रमक पवित्रा घेण्याचा महिलांनी निर्धार केला आहे निवेदनावर कमलबाई कारभारी शिंनगारे, संगीता विठ्ठल काळे सौ.नंदा विजय सोनुने, सौ अलका विनोद सोनुने, सौ गोदावरी किशोर शिंदे सौ अनिता शिवाजी धोत्रे, नंदा बाळू कसबे,सौ उज्वला विष्णू फुले ,सौ संगीता विष्णू खंडारे, सौ वनिता गजानन फुले, सौ सुनीता शिवाजी भालेराव ,सौ शोभा भगवान कहाळे, सौ सिंधुबाई रमेश शिंदे सौ चंद्रभागा रामदास कहाळे आदींच्या निवेदनावर सह्या आहेत

## डाक विभागात एजंटसाठी अर्ज मागविले; १७ फेब्रुवारीला उपस्थित राहण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** भारतीय डाक विभागाकडून डाक जीवन विमा योजनेंतर्गत जिल्ह्यातील टपाल जीवन विमा योजनेसाठी थेट अभिकर्ता व क्षेत्र अधिकारी यांची नेमणूक करण्याकरिता इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. इच्छुकांनी आवश्यक कागदपत्रासह दि. १७ फेब्रुवारी २०२५ रोजी उपस्थित राहावे, असे आवाहन डाकघर अधीक्षक गणेश आंभोरे यांनी केले आहे.

थेट अभिकर्तासाठी अर्जाचा नमुना बुलडाणा प्रधान डाक घर किंवा डाक अधीक्षक बुलडाणा यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. एजंट भरतीसाठी उमेदवाराचे किमान वय १८ वर्ष असावे, शैक्षणिक पात्रता किमान दहावी पास असावी. बेरोजगारीत किंवा स्वयंम रोजगारीत शिक्षित युवा, माजी जीवन सल्लागार, इन्शुरन्स कंपनीचे माजी एजंट, माजी सैनिक, अंगणवाडी सेविका, महिला मंडळ सेविका, सेवानिवृत्त शिक्षक व इतर अर्ज करू शकतील. उमेदवाराची निवड थेट मुलाखतीद्वारे व्यावसायिक कौशल्य, व्यक्तिमत्व, परस्पर संबंधाचे कौशल्य, जीवन विम्याबाबत ज्ञानाच्या आधारावर केली जाणार आहे.

निवड झालेल्या उमेदवारास ५ हजार रूपयांची अनामत रक्कम सुरक्षा ठेव म्हणून ठेवावी लागेल. सदर रक्कम राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र अथवा कृषी विकास पत्राच्या स्वरुपात राहणार आहे. प्रशिक्षण पूर्ततेनंतर डाक विभागाकडून तात्पुरता परवाना देण्यात येईल. हा परवाना आयआरडीएची परवाना परीक्षा पास केल्यानंतर कायमच्या परवान्यामध्ये रुपांतरीत केल्या जाणार आहे. ही परवाना परीक्षा नियुक्तीनंतर ३ वर्षाच्या आत पास करणे अनिवार्य राहिल. निवड झालेल्या उमेदवारास ठरविलेले कमिशन दिले जाणार आहे. इच्छुक उमेदवारांनी अधीक्षक, डाक घर कार्यालय, बुलडाणा ४४३००१ येथे विहित नमुन्यातील अर्ज आणि दहावी किंवा बारावी बोर्डाचे प्रमाणपत्र, जन्मतारखेचे प्रमाणपत्र, संगणक ज्ञानाचे प्रमाणपत्र, यासह सर्व शैक्षणिक प्रमाणपत्र, तसेच पॅन कार्ड, आधार कार्ड व अन्य संबंधित दस्ताऐवजासोबत दि. १७ फेब्रुवारी २०२५ रोजी ११ ते २ वाजेदरम्यान उपस्थित राहावे. अधिक माहितीसाठी जवळच्या डाक कार्यालयाशी संपर्क साधावा, असे डाकघर अधीक्षक यांनी कळविले आहे.

## तब्बल ६३ वर्षानंतर धुळे जिल्ह्याला मिळाले महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेमध्ये सुवर्णपदक



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** धुळे शहरातील एकनाथ विजय व्यायाम शाळेचे मल्ल चंद्रशेखर गवळी यांनी अहिल्यानगर येथे सुरू असलेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेमध्ये माती विभागात ८६ किलो वजन गटामध्ये सुवर्णपदकाचे कामगिरी केली आहे. धुळे जिल्ह्याला तब्बल ६३ वर्षानंतर सुवर्णपदकाची कमाई करता आली आहे. महाराष्ट्र मध्ये कोल्हापूर, सोलापूरसह धुळे जिल्हा देखील कुस्तीचे बाहेर घर म्हणून ओळखला जातो. आणि आता याच धुळे जिल्ह्याला तब्बल ६३ वर्षानंतर महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेमध्ये सुवर्णपदकाची कामगिरी करता आली आहे.

## नाफेडच्या सोयाबीन खरेदीला मुदत वाढ द्या; शिवसेना ठाकरे गटाची निदर्शने



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** नाफेडची सोयाबीन खरेदी आज पासून बंद होणार आहे. मात्र हजारो शेतकऱ्यांच्या घरामध्ये ५० टक्के सोयाबीन तूर पडून आहे. तर नाफेड खरेदी केंद्राबाहेर अनेक शेतकऱ्यांच्या रांगा लागल्या आहेत. त्यामुळे सोयाबीनच्या शेवटच्या दाना संपेपर्यंत नाफेडने खरेदी केंद्र मुदतवाढ द्यावीच आणि नाफेड सोयाबीन खरेदी केंद्र सुरूच ठेवावे. या मागणीसाठी आज शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत यांच्या नेतृत्वात बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.

# जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयांतर्गत असलेल्या नेहरु युवा केंद्राव्दारे दि. २६ जानेवारी रोजी आयोजित जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न झाले. यावेळी विविध स्पर्धेत सहभागी विजेता खेडाळूंना मान्यवरांच्या हस्ते पारितोषीक वितरण करण्यात आले.

स्पर्धेच्या सुरुवातीला बुलढाणा तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा घेण्यात आले. १०० मी धावणे स्पर्धेत मुलांमध्ये प्रथम क्रमांक किशोर बरेडे, व्दितीय क्रमांक सचिन घोती, तृतीय क्रमांक संकेत वायाळ तर मुलींमध्ये प्रथम जान्हवी खरात, व्दितीय क्रमांक नेहा जाधव, तृतीय क्रमांक विजयालक्ष्मी वारंगाणे यांनी पटकविला. गोळाफेक या खेळात मुलांमध्ये प्रथम क्रमांक सागर पाटील, व्दितीय क्रमांक सागर बोर्डे, तृतीय क्रमांक तिलक तोंडीलायता यांनी तर मुलींमध्ये प्रथम नेहा जाधव, व्दितीय क्रमांक वैष्णवी निकाळजे, तृतीय क्रमांक मिरा टेकाळे यांनी पटकविला. खो-खो या खेळात प्रथम क्रमांक ऑफिनिटी युथ क्लब पाडळी, व्दितीय क्रमांक-शिवसाई क्लब बुलढाणा तर तृतीय क्रमांक जिजामाता क्लब बुलढाणा यांनी पटकविला. कबड्डी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक जय मातृभूमी मंडळ, बुलढाणा, व्दितीय क्रमांक जय हनुमान मंडळ साखळी तर तृतीय क्रमांक जय मॉ शेरावाली संघ तारापूर यांनी पटकविला.

तालुकास्तरीय स्पर्धेनंतर जिल्हास्तरीय स्पर्धा घेण्यात आले. यामध्ये १०० मी धावणे स्पर्धेत मुलांमध्ये प्रथम क्रमांक सचिन घोती, व्दितीय क्रमांक किशोर बरडे, तृतीय क्रमांक गौरव वाडेकर तर मुलींमध्ये प्रथम जान्हवी खरात, व्दितीय क्रमांक गौरी राठोड, तृतीय क्रमांक नेहा जाधव यांनी पटकविला. गोळाफेक या खेळात मुलांमध्ये प्रथम क्रमांक रोहीत इंगळे, व्दितीय क्रमांक- शिवानंद केकन, तृतीय क्रमांक सागर पाटील यांनी तर मुलींमध्ये प्रथम नेहा जाधव, व्दितीय



क्रमांक निता बामणे, तृतीय क्रमांक-वैष्णवी निकाळजे यांनी पटकविला. खो-खो या खेळात प्रथम क्रमांक श्री शिवाजी क्लब चिखली, व्दितीय क्रमांक भिंगारा ता.जळगांव जामोद, तर तृतीय क्रमांक ऑफिनिटी युथ क्लब पाडळी यांनी पटकविला. कबड्डी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक जय मातृभूमी मंडळ, बुलढाणा, व्दितीय क्रमांक दत्त क्रीडा मंडळ जळगांव जामोद, तर तृतीय क्रमांक रेणुका क्रीडा मंडळ मोहदरी ता. चिखली यांनी पटकविला. सर्व विजयी स्पर्धकांना ट्राफी, मेडल्स व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले.

स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा क्रीडा अधिकारी बाळकृष्ण महानकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी नेहरु युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवीकर, लेखा व कार्यक्रम पर्यवेक्षक अजयसिंग राजपूत, युथवेल संचालक राजेश शेळके, थेलेटीक कोच विजय वानखडे, कैलास करवंदे, धनंजय चाफेकर, निलेश पवार हे उपस्थितीत होते. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाकरीता आकाश चाफेकर, सुहास राऊत आदींनी परिश्रम घेतले.